महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३
Head Office: "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☏:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९

प्रिन्सिपल कार्यालय : एमआयडीसी, ४ था मजला, एक्सप्रेस टॉवर, रामनाथ गोयंका मार्ग, एअर इंडिया इमारतीजवळ, नरिमत पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
Principle Office: MIDC Office, 4th Floor, Express Tower, Ramnath Goenka Marg, Near Air India Building, Nariman Point, Mumbai-400 021. ☏: +91-022-46677172/45758643
www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/ पी-317040 दिनांक: 29/07/2026

## परिपत्रक

**विषय: भूखंड वाटपाच्या अधिकारात सुधारणा करणेबाबत.**

संदर्भ: १) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/ पी१६१०३८, दिनांक ०२.०१.२०२५
२) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/ पी२०९२१७, दिनांक ०४.०७.२०२५.
३) परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/पी२२१३०९, दिनांक १७.१०.२०२५

महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार MILAAP पोर्टलवर A) Online Direct Allotment पध्दतीने महामंडळाच्या धोरणानुसार आरक्षित सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांसाठी राखीव भूखंड वाटपाच्या अधिकारात दिनांक ०४/०७/२०२५ रोजीच्या परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामकाज विषय | अधिकार प्रदान केलेली समिती / अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ५.१.९ (इ) | सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांकरीता महामंडळाच्या धोरणानुसार आरक्षित भूखंडाचे वाटप (Reserved MSME Plots-करीता प्राप्त सर्व अर्ज) | |
| | १००० चौ.मी. पर्यंत | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भू-वाटप समिती. |
| | १००१ चौ.मी. ते २५०० चौ.मी. पर्यंत | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भू-वाटप समिती. |

टीप : सर्व भूखंड वाटप समितीच्या बैठका ऑनलाईन पध्दतीनेच होतील. त्याकरीता MILAAP (MIDC Industrial Land Application Allocation Portal) प्रणालीचा अवलंब करण्यात यावा. कोणताही ऑफलाईन (Offline) भूखंड मागणी अर्ज भूखंड वाटप समितीसमोर सादर करण्यात येवू नयेत.

१) MSME प्रवर्गातील भूखंड वाटपासाठी प्राप्त झालेल्या प्रलंबित अर्जाची त्वरित छाननी करून, भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार विकेंद्रीत करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून, सदरचे परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत भूखंड वाटप समितीची बैठक आयोजित करून अर्जावर निर्णय घेऊन निकाली काढणे बंधनकारक राहील.

२) तसेच नव्याने प्राप्त होणा-या MSME प्रवर्गातील अर्जावर परिपत्रक क्रमांक पी२२१३०९, दिनांक १७.१०.२०२५ मधील तरतूदीनुसार विहित मुदतीत संबंधितांनी निर्णय घेणे बंधनकारक राहील.

३) दिनांक १७/१०/२०२५ रोजीच्या मिलाप च्या परिपत्रकामधील परिशिष्ट १ नुसार MSME प्रवर्गाच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४) सुक्ष्म लघू व मध्यम उद्योजकांसाठी राखीव भूखंडासाठी अर्ज करताना खालील कागदपत्रे प्रकल्प अहवाल (DPR) सोबत प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे:

- उद्यम / MSME नोंदणी (Udyam /MSME Registration)
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- जात पडताळणी प्रमाणपत्र (Caste Validity) - लागू असल्यास
- दिव्यांग प्रमाणपत्र- लागू असल्यास
- माजी सैनिक प्रमाणपत्र - लागू असल्यास

५) महिला उद्योजक, महिला भागीदारी संस्था, महिला सहकारी संस्था, महिला कंपनी किंवा नोंदणीकृत महिला बचत गट यांनी उद्योगामध्ये आवश्यक महिला भागभांडवल कायम ठेवणे बंधनकारक राहील.

६) राखीव प्रवर्गातील भूखंडाचे हस्तांतरण त्याच प्रवर्गातील पात्र व्यक्ती/संस्थेलाच महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार करता येईल.

७) सुक्ष्म लघू व मध्यम उद्योजकांसाठी राखीव प्रवर्गातील भूखंडांचे एकत्रीकरण (Amalgamation) करण्यास परवानगी राहणार नाही.

८) महामंडळाच्या परिपत्रक क्रमांक सी७५०१५, दिनांक २०.०८.२०१९ नुसार एकूण क्षेत्रापैकी MSME प्रवर्गासाठी १०% अथवा २०% निर्धारित आरक्षित क्षेत्राच्या मर्यादेपेक्षा अधिक क्षेत्र आरक्षित करता येणार नाही. तसेच, सदर मर्यादेपेक्षा अधिक क्षेत्रफळाची जमीन MSME प्रवर्गात वाटप करता येणार नाही.

९) प्रस्तुतच्या परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांद्वारे केवळ MSME याच प्रवर्गातील भूखंडाचे वाटप करणे बंधनकारक राहील.

१०) MSME करीता सरळ पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जास प्रथम प्राधान्य देवून इतर ई-निविदा अंतर्गत प्राप्त सर्व अर्जदारांचे प्रक्रीया शुल्क ऑनलाईन परत (Onlilne Refund) करण्यात येईल.

११) सरळ पद्धतीमध्ये (Direct Allotment) एखाद्या भूखंडासाठी एकापेक्षा जास्त पात्र अर्ज प्राप्त झाल्यास ऑनलाईन Close Bidding प्रक्रिया राबविण्यात येईल व उच्चतम दर देणाऱ्या पात्र अर्जदारास भूखंड वाटप करण्यात येईल.

सबब, सर्व संबंधितांनी उपरोक्त सुधारीत धोरण, कामकाजाची विभागणी व अधिकारातील बदल इत्यादीची नोंद घ्यावी व तात्काळ प्रभावाने कार्यवाही करण्यात यावी.

(दीपेन्द्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई

(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)

(३) महाव्यवस्थापक (मा व तं) यांना संगणक प्रणालीमध्ये आवश्यक त्या अद्ययावतनाकरीता.

(४) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)

(५) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम

(६) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम

(७) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम

(८) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.

(९) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,

(१०) सर्व औद्योगिक संघटना

(११) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / एक्सप्रेस टॉवर, मुंबई.